# लोक महाविद्यालय, वर्धा
# इतिहास विभाग
# वर्ष २०१३ -१४
# अहवाल

लोक महाविद्यालय वर्धा २०१३ - २०१४ शैक्षणिक वर्षातील सत्रामध्ये इतिहास अभ्यास मंडळाची स्थापना करण्यात आली. इतिहासात मानवाच्या ऐतिहासिक, राजकीय, सांस्कृतिक, सामाजिक व धार्मिक जीवनाचा अभ्यास केला जातो. त्या निमित्याने विभागाच्या वतीने विवाहपूर्व मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. पुष्पा तायडे तर प्रमुख अतिथी म्हणून चेतना विकास संस्थेच्या शिला लामसे, संध्या सातपूते उपस्थित होत्या. या कार्यक्रमाला महिला कक्षाच्या प्रमुख प्रा. सुचित्रा पाटणे यांची प्रमुख उपस्थिती होती.

२०१४-१५ या सत्रात इतिहास अभ्यास मंडळाच्या वतीने बी.ए. भाग १ व बी.ए. भाग ३ च्या विद्यार्थ्यांच्या सेमीनारचे आयोजन करण्यात आले. त्यामध्ये विद्यार्थ्यांनी प्राचीन भारतातील मौर्याची प्रशासन व्यवस्था तसेच सूलतान शाहीतील अलाउद्दीन खिलजीच्या सुधारणा, महम्मद तुघलकाच्या योजना तसेच बी.ए. भाग ३ च्या विद्यार्थ्यांनी कैसर विलियम युमूत्याचे परराष्ट्र धोरण व इंग्रजांनी भारताची केलेली आर्थिक लुट या विषयावर सेमिनार आयोजीत करण्यात आले.

दि. १० डिसेंबरला महाविद्यालयात सांस्कृतिक कार्यक्रम 'लोकरंजन' चे आयोजन करण्यात आले. त्यामध्ये इतिहास विभागाच्या विद्यार्थ्यांनी महाराष्ट्राचे लोकनृत्य लावणी सादर केली, प्राचीन ते आधुनिक इतिहासातील व्यक्तिरेखा विद्यार्थ्यांनी सादर केल्या. त्याप्रमाणे छत्रपती शिवाजी महाराजाच्या जीवनावर एक नाटिका सादर केली.

डॉ. सौ. सरीता एस. गणराज

# लोक महाविद्यालय, वर्धा

## इतिहास विभाग

## वर्ष २०१७ -१८

इतिहास विभागा अंतर्गत भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांची जयंती ५ सप्टेंबर साजरी करण्यात आली. इतिहास विषया विषयी विद्यार्थ्यांमध्ये आवड निर्माण व्हावी तसेच जागतीक स्तरावरील समस्यांचे आकलन व्हावे व ऐतिहासिक ज्ञानाचे उपयोजन करता यावे या हेतूने इतिहास अभ्यासमंडळाचे कार्यकारिणीची निवड करण्यात आली. इतिहास अभ्यास मंडळ कार्यकारिणीची स्थापना दि. २८/०८/२०१७ रोजी पद्व्युत्तर इतिहास विभागामध्ये एम.ए. भाग-१ व २ च्या विद्यार्थ्यांची संयुक्त बैठक घेण्यात आली या बैठकीत विविध विषयांवर चर्चा करून इतिहास अभ्यास मंडळाची कार्यकारिणी निवडण्यात आली. इतिहास अभ्यास मंडळाचे अध्यक्ष म्हणून श्री. विलास जाधव तर सचिव म्हणून श्री. शुभम राजूरकर व कोषाध्यक्ष म्हणून अमोल कुकुटकर यांची एक मताने निवड करण्यात आली इतिहास अभ्यासाचा एक भाग म्हणून बी.ए. भाग १,२,३ आणि एम.ए. भाग १ व २ च्या विद्यार्थ्याकरिता चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. 'बिस्मार्कची विदेशीनिती' या विषयावर प्रा. डॉ. एस. गणराज यांनी मार्गदर्शन केले.

दि. ३०/०८/२०१७ ला इतिहास मंडळाचे उद्‌घाटन कार्यक्रम अतंर्गत डॉ. व्ही. जी. बैस यांनी इतिहासातील काही पानांचा संदर्भ घेत जमनालाल बजाज व महात्मा गांधी यांच्या जीवन कार्यावर विचार व्यक्त केले. प्राचार्य डॉ. साहूरकर इतिहास विभाग प्रमुख प्रा. डॉ. एस. गणराज, प्रा. सुनिल पाटणे यांनी मार्गदर्शन केले.

दि. १३/१०/२०१७ ला प्रा. डॉ. एस. गणराज इतिहास विभाग प्रमुख तथा प्राचार्य यांच्या परवानगीने प्रा. प्रविन भगत, प्रा. वर्षा महेशकर यांनी एम. ए. भाग १ व २ च्या विद्यार्थ्यांचे पारडसिंगा, आदासा, दिक्षाभूमि, अक्षरधाम येथे शैक्षणिक सहलीचे आयोजन करण्यात येऊन विद्यार्थ्यांना या स्थळांची ऐतिहासिक माहिती देण्यात आली. दि. १६/०२/२०१८ बी.ए. भाग १,२,३ तसेच एम. ए. भाग १ व २ च्या विद्यार्थ्यांना असाइनमेंट देण्यात आले. त्यावर दि. ०७/०३/२०१८ ला सेमिनारचे आयोजन करण्यात आले. त्यामुळे दिलेल्या विषयाबद्दल विद्यार्थ्यांना सविस्तर माहिती प्राप्त झाली. दि. २८/०३/२०१८ ला एम. ए. भाग २ च्या विद्यार्थ्यांना निरोप देण्यात आला या प्रसंगी इतिहास विभाग प्रमुख प्रा. डॉ. एस. गणराज प्रा. वर्षा महेशकर, प्रा. प्रविण भगत यांचे मार्गदर्शन लाभले या प्रसंगी विद्यार्थ्यांनी आपले मनोगत देखील व्यक्त केले.

इतिहास विभाग प्रमुख

प्रा. डॉ. सौ. सरिता गणराज

# लोक महाविद्यालय, वर्धा

## इतिहास विभाग

## वर्ष २०१६ -१७

शैक्षणिक सत्र २०१६-१७ मध्ये इतिहास विभागा अंतर्गत इतिहास अभ्यास मंडळाची स्थापना करण्यात आली. यामंडळामध्ये बी. ए. भाग १,२,३ आणि एम. ए. भाग १ व २ च्या विद्यार्थ्यांचा समावेश करण्यात आला. इतिहास अभ्यास मंडळा अंतर्गत वर्षभर विविध कार्यक्रम राबविण्यात आले व तसेच विविध ऐतिहासिक दिन साजरे करण्यात आले.

इतिहास तज्ञ डॉ. फ्रांसिस बेकन यांच्या मते “मानवाला शहाण बनविणारी विद्या शाखा म्हणजे इतिहास होय” त्याही पुढे जाऊन डॉ. इ.एच.कार म्हणतात की, “इतिहास म्हणजे भूतकाळ व वर्तमानकाळ आणि भविष्यकाळ यांच्यातील कधी न संपणारा संवाद होय ” अशा प्रकारे इतिहासाचे महत्त्व विद्यार्थ्यांना कळावे त्यांच्या मनात इतिहासाविषयी जिज्ञासा निर्माण व्हावी या उद्‌देशाने बी. ए. भाग १,२,३ आणि एम. ए. भाग १,२ च्या विद्यार्थ्यांसाठी चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. चर्चासत्राला विद्यार्थ्यांनी उत्स्फुर्त प्रतिसाद दिला. बी.ए. भाग १,२,३ तसेच एम. ए. भाग १,२ च्या विद्यार्थ्यांना असाईमेंट देण्यात आले त्यावर विद्यार्थ्यांचे सेमिनार घेण्यात आले. अशा प्रकारे शैक्षणिक सत्र २०१६-१७ या वर्षात विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासाकडे विविध उपक्रमांच्या माध्यमातून लक्ष देण्यात आले.

इतिहास विभाग प्रमुख
प्रा. डॉ. सौ. सरिता गणराज